रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### महापौर भाजपाचा करा, जालन्याचा विकास आमची जबाबदारी, आम्ही उमेदवारांचे जामीनदार

# जालन्याच्या विकासाची लक्ष्मी कमळावर येणार - ना. चंद्रशेखर बावनकुळे





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराचा पहिला महापौर हा भारतीय जनता पार्टी चा करण्यासाठी शहरातील भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करा, भाजपाचा पहिला महापौर झाल्यास मी पहिल्याच बैठकीमध्ये शहरातील नागरिकांना शासनाची कोणतीही फीस न घेता मोफत पीआर कार्ड देणार असल्याचे मत महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी जालना शहरातील भाजपाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ वीर सावरकर चौक व छत्रपती संभाजी महाराज उद्यान (मोतीबाग) येथील आयोजित प्रचार सभेत केले. वीर सावरकर चौकातील सभेत उन्हात बसलेल्या मतदार राजाला पाहताच सर्वप्रथम मंत्री बावनकुळे यांनी क्षमा मागितली. ते म्हणाले उन्हात बसावं लागत म्हणून मी क्षमा मागतो. कमळाला मत हे विकासाला मत आहे, बाकी सर्व भकास असल्याचे ते म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा जालना महानगरपालिका निवडणूक प्रभारी रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, आ.संतोष पाटील दानवे, महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, राजेशजी राऊत, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, धनराज काबलिये प्रभागातील उमेदवारांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मतदारांशी संवाद साधतांना ना.बावनकुळे म्हणाले की, हि निवडणूक पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, यांच्या केंद्र व राज्य शासनाच्या जवळपास १२४ विकास योजना जालना शहरात राबविण्यासाठी अत्यंत महत्वाची निवडणूक आहे, केंद्रातील मोदी सरकार, राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकार व माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे व माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आमदार कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या नेतृत्वाखाली हि जालनेकरांना पुढे नेण्यासाठी भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करून विकास कामात मतदारांनी सहभाग नोंदवावा तसेच जालना शहरातील नागरिकांनी महापालिकेत भाजपाची सत्ता दिल्यास गायरानावरील व अतिक्रमण झालेल्या नागरिकांना कोणतीही शासकीय फीस न घेता मोफत पिआर कार्ड देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. जालना महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यास पहिला ठराव पीआर कार्ड मोफत देण्याबाबतचा घेऊन तो मी मुख्यमंत्री महोदयांकडून एक महिन्याच्या आत मंजूर करण्यात येईल. जालना शहरातील मालमत्तेची रक्षण करण्याची जबाबदारी हि भाजपा सरकारची. जालना शहरात पंधरा हजार घरे केंद्र शासनाकडून मोफत देण्यात येईल. तसेच प्रत्येक घराला प्रधानमंत्री सूर्यघर योजनेचा लाभ देण्यात येईल व त्याची शासनाकडून सूर्यघर त्याचे पंधरा वर्षा पर्यंत बिल येणार नाही.

महापालिकेचा रथ हा चारचाकी आहे. मोदींचे एक चाक, फडणवीसांचे एक चाक, पालकमंत्र्यांचे एक चाक तर रावसाहेब दानवेंच एक चाक अशा या चार चाकी रथाचा सारथी भाजपाचा कार्यकर्ता करण्यासाठी येत्या १५ तारखेला कमळ चिन्हाचे बटन दाबून विकासाच्या गाडीचा महापौर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

जालना शहराच्या विकासासाठी तुम्ही भाजपाच्या कमळाचे जोरात बटन दाबा व सर्व उमेदवारांना निवडून द्या, जनतेची सेवा करू, भाजपाची जबाबदारी आहे. भाजपाच्या सर्व उमेदवारांचे आम्ही जामीनदार आहोत, कमळाला मत म्हणजे विकासाला मत आहे. बाकी सगळे भकास आहे, लक्ष्मीपुजन दिपावलीत झाले त्यावेळी आपल्या घरी महालक्ष्मी ही कमळावर आली होती. जालन्याच्या विकासाची लक्ष्मी ही कमळावर येणार आहे, , मी विकास कामासाठी जालना शहराला निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आवाहन ना.बावनकुळे यांनी केले.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी यावेळी बोलतांना १६ प्रभागातील ६५ उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन केले. जालना नगर पालिकेत काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेची सत्ता राहीली आहे. आतपर्यंत भाजपाला सत्ता मिळाली नाही. महापालिका भाजपाच्या ताब्यात द्या असे आवाहन त्यांनी केले. राज्यात सत्तांतर झाले त्यानंतर विकासाची चक्रे फिरली. मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली. जालनेकरांच्या पाणी प्रश्नासाठी देवेंद्र फडणवीस विरोधी पक्षनेते असतांना आवाज उठविला होता. त्यांनतर फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यानी ९० कोटी रुपये पाण्यासाठी दिले आहे. त्या माध्यमातून योग्य क्षमतेचे फिल्टर प्लांट होत आहे. घाणेवाडीतून पाणी पुरवठा करणारी यंत्रणा आता जुनी झाली आहे. ती संपूर्ण यंत्रणा नविन करून शहराला पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. शहराच्या चारही बाजुंनी सिमेंट रस्ते झाले. इतर शहराशी रस्त्यांमुळे चांगली कनेक्टीव्हीटी झाली आहे. जालना- जळगाव रेल्वे मार्ग, मेडीकल कॉलेज, आटीसी कॉलेज च्या माध्यमातून विविध विकास कामे होत आहेत. खा. काळे यांना त्यांनी यावेळी खुले आव्हान देत पुढील एक वर्षात शहरात कोणती विकासकामे करणार हे त्यांनी सांगावे मी पुढील एक वर्षात कोणती कामे करतो ते सांगतो.

यावेळी प्रभाग क्र.७ चे भाजपाचे अधिकृती उमेदवार राजेश राऊत, सुनील खरे, पार्वती देशमाने, स्नेहलता कामड तसेच प्रभाग क्र. १४ मधील अधिकृत उमेदवार सौ. रमा काळे, अशोक (लक्ष्मीकांत) पांगारकर, सुलोचना गोर्डे, शशिकांत घुगे आदींसह प्रभागातील मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# केंद्र सरकारकडून 'मनरेगा'चा गळा आवळण्याचा प्रयत्न

### खासदार डॉ. कल्याण काळे यांचा घणाघात

**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेसच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम आणि गावाचा विकास या दुहेरी उद्देशाने सुरू झालेली 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) सध्याचे केंद्र सरकार पद्धतशीरपणे मोडीत काढत असल्याचा गंभीर आरोप खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केला आहे. या जुलमी निर्णयांविरोधात जनतेचा आवाज उठवण्यासाठी जिल्हास्तरावर पत्रकार परिषदांचे आयोजन करण्यात आले असून, आगामी काळात तीव्र आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

कायद्याचे स्वरूप आणि स्वायत्ततेवर घाला.

पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. काळे म्हणाले की, मूळ कायद्यानुसार ग्राम पंचायतीला आपल्या गावचा विकास आराखडा तयार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. मजुरांना कामाचा हक्क मिळायचा आणि केंद्राकडून निधी थेट मिळायचा. मात्र, आता केंद्र सरकार 'विकसित भारत'च्या नावाखाली ही योजना हायजॅक करत आहे. दिल्लीत बसून गावावर नियंत्रण मिळवण्याचा हा प्रयत्न लोकशाहीसाठी घातक आहे.

**निधीच्या वाटपात मोठी कपात**

खासदार काळे यांनी योजनेच्या आर्थिक गणितातील बदलांवर चिंता व्यक्त केली: जुना नियमानुसार केंद्र सरकार ९० टक्के आणि राज्य सरकार १० टक्के निधी देत होते. नवा बदलात आता केंद्र सरकारने आपला वाटा केवळ ६० टक्क्यांवर आणला असून, ४० टक्के भार राज्यावर टाकला आहे.

याचा परिणाम ४० टक्के निधी राज्याला द्यावा लागणार असल्याने, राज्य सरकार ही कामे करण्यास अनुत्सुक राहील, ज्यामुळे ग्रामीण भागातील विकास ठप्प होईल. असेही ते म्हणाले.

**महत्त्वाचे मुद्दे आणि आक्षेप**

१०० दिवसांच्या कामाचा अधिकार धोक्यात: मजुरांना वर्षाकाठी १०० दिवस काम मिळण्याची कायदेशीर हमी आता नष्ट केली जात आहे.



नाव बदलण्याचा घाट: महात्मा गांधींचे नाव असलेल्या या योजनेचे स्वरूप बदलून तिला 'विकसित भारत' अंतर्गत सामावून घेण्याचा प्रयत्न होत आहे.

हा कायदा जनतेच्या हितासाठी करण्यात आला होता. सरकारने केलेले नवे बदल त्वरित मागे घेऊन जुना कायदा जसाच्या तसा लागू करावा. मजुरांच्या पोटावर पाय

ग्रामपंचायतीचे अधिकार काढले: गावातील कामे कोणती असावीत हे ठरवण्याचे ग्रामपंचायतीचे अधिकार मर्यादित करून 'सेंट्रलाईज्ड' पद्धत लागू केली जात आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष: शेतकऱ्यांच्या शेतातील कामेही रोजगार हमी योजनेत समाविष्ट करावीत, अशी मागणी काँग्रेसने वारंवार केली, परंतु सरकारने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले.

देण्याचे काम हे सरकार करत आहे. या अन्यायाविरोधात आम्ही रस्त्यावर उतरून उपोषण आणि आंदोलने करू असा ईशारा खा. डॉ. कल्याण काळे यांनी दिला आहे. या मुद्द्यावर जनजागृती करण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये मनरेगा बचाव संग्रामचा नारा देत पत्रकार परिषदा घेतल्या जात आहेत. मजुरांचा रोजगाराचा हक्क हिरावला जाऊ नये, यासाठी काँग्रेस पक्ष आक्रमक पवित्रा घेणार असल्याचे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.

# प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम, संवेदनशील नेतृत्व आवश्यक - अण्णासाहेब चित्तेकर

### रिंकल उर्फ सुनिता तायड यांना नागरिकांनी ठाम पाठिंबा देण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आता नवा, सक्षम, संवेदनशील आणि लोकाभिमुख चेहरा आवश्यक आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने, निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या रिंकल उर्फ सुनिता भगवान तायड यांच्या पाठीशी नागरिकांनी ठामपणे उभे राहावे, असे आवाहन अण्णासाहेब चित्तेकर यांनी केले. ते शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये आयोजित नागरिक संवाद व प्रचार कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमाला मिर्झा अन्वर बेग व श्री. कावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभलेल्या या कार्यक्रमात परिसरातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव**

यावेळी बोलताना अण्णासाहेब चित्तेकर म्हणाले की, रिंकल उर्फ सुनिता तायड या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. महिलांचे प्रश्न, युवकांचे शिक्षण, बेरोजगारी, पिण्याच्या पाण्याची समस्या, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे.

कोणताही भेदभाव न करता समाजातील सर्व घटकांसाठी काम करणारी त्यांची कार्यपद्धती पारदर्शक, लोकाभिमुख आणि विश्वासार्ह असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून जनतेचा विश्वास संपादन केला असून आजच्या राजकारणात अशा कार्यकर्त्यांची नितांत गरज असल्याचे चित्तेकर यांनी स्पष्ट केले.

**केवळ आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष कामावर भर**

आज केवळ भाषणबाजी व आश्वासनांवर आधारित राजकारण नको, तर प्रत्यक्ष मैदानात उतरून सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणारे नेतृत्व आवश्यक आहे, असे प्रतिपादन अण्णासाहेब चित्तेकर यांनी केले. रिंकल उर्फ सुनिता तायड या अशाच कार्यकर्त्या आहेत. त्या नेहमीच जनतेमध्ये राहून प्रश्न जाणून घेतात आणि त्यावर उपाय शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. प्रभागाच्या विकासासाठी त्या सातत्याने झटत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात बोलताना अरविंद चव्हाण यांनीही रिंकल उर्फ सुनिता तायड यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी त्या नेहमी उपलब्ध असतात. गरीब, गरजू, महिला, युवक, वृद्ध अशा सर्वांसाठी त्या तितक्याच आत्मीयतेने काम करतात. त्यांना संधी दिल्यास प्रभागाचा सर्वांगीण विकास निश्चित साधला जाईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी नागरिकांना 'घड्याळ' या निवडणूक चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन केले.

**नागरिकांच्या समस्या थेट ऐकून घेतल्या**

कार्यक्रमादरम्यान नागरिकांनी आपल्या विविध समस्या थेट मांडल्या. त्यामध्ये अपुरा पाणीपुरवठा, खड्डेमय रस्ते, अस्वच्छता, ड्रेनेजची दयनीय अवस्था, आरोग्य सेवांचा अभाव, स्ट्रीट लाईट बंद पडणे, अशा अनेक प्रश्नांचा समावेश होता.

**समस्या सोडवण्याची ग्वाही**

या सर्व समस्यांवर उत्तर देताना रिंकल उर्फ सुनिता तायड म्हणाल्या की, नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष दिले जाईल. नियोजनबद्ध पद्धतीने सर्व समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातील. प्रभागाचा विकास हा केवळ प्रतिनिधीचा नव्हे, तर नागरिकांच्या सहभागातून साधायचा आहे. नागरिकांच्या सहभागातून पारदर्शक कारभार करून प्रभागाचा आदर्श विकास साधण्याचा आपला निर्धार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**महिलांचा व युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

या नागरिक संवाद व प्रचार कार्यक्रमाला परिसरातील महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महिलांनी रिंकल तायड यांच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी राहुल लष्कर, पुष्पा चव्हाण, राणी शिंदे, सीमा लामगे, सुनीता डोंगरदिवे, यास्मिन शेख, नेहा पाटील, तेजस्विनी पाटील, प्रांजल राठोड, रंजना साबळे, लता नरवडे, मनीषा बोर्डे, मीना लहाने, लंका येडे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादकीय पान

# भारताचे 'लाल'

भारत मातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज पुण्यतिथी आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. पुण्यतिथीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६

## मतदानासाठी यंत्रणा सज्ज

# १३८८ मतदान कर्मचाऱ्यांचे अंतिम प्रशिक्षण संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची म तदान प्रक्रिया गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तिसरे आणि अंतिम प्रशिक्षण आज, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी यशस्वीपणे संपन्न झाले.

प्रशिक्षण सत्राचा सविस्तर आढावा

आजचे प्रशिक्षण सेंट मेरीज हायस्कूल, देऊळगाव राजा रोड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (टाऊन हॉल) येथे दोन सत्रांत आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणादरम्यान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांना ईव्हीएम (एतच्) हाताळणी, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीची कर्तव्ये आणि तांत्रिक बाबींचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

माहितीनुसार प्रशिक्षणास १३८८ कर्मचाऱ्यांनी उपस्थिती दर्शविली असून, गैरहजर ४४ कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित आहे)

मतदान पथकांचे प्रस्थान म तदान केंद्रांवर नियुक्त सर्व पथके बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी मतदानाच्या साहित्यासह केंद्रांकडे रवाना होतील. यासाठी मे. सिद्दिकी इंजिनिअरिंग, नवीन एमआयडीसी, फेज ३, छत्रपती संभाजी नगर रोड येथे वितरण केंद्राची (ऊळीीरींलह उशपींशी) स्थापना करण्यात आली आहे. येथून सर्व पथकांना ईव्हीएम आणि इतर आवश्यक सामुग्रीचे वाटप करण्यात येईल.

मतदार जनजागृती आणि पोलिंग चिट वाटप

निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील एकूण २९१ मतदान केंद्रांवरील २ लाख ४५ हजार ९२९ मतदारांना माहिती देण्यासाठी २२४ म तदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या बीएलओमार्फत प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन 'पोलिंग चिट' (झेश्रश्रळपस डश्रळ) वाटप करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

निवडणूक प्रक्रिया निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहिता कक्ष अहोरात्र कार्यरत आहे. आतापर्यंत इंदेवाडी चेकपोस्टवर १५.२७ लाख आणि छत्रपती संभाजीनगर टोलनाका येथे ९८ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. जालना शहर महानगरपालिका प्रशासन १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी पूर्णतः सज्ज झाले असून, *जालना शहर महानगरपालिकेच्या पहिल्या निवडणुकीकरता* नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# नायलॉन मांजाच्या खरेदी-विक्रीवर पुर्णतः बंदी असतांना जिवघेणा मांजा येतो कोठुन ?

कायदे,अटी,नियम,बंदी अस्तित्वात असूनही नायलॉन मांजाची खरेदी-विक्री दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे.नायलॉन मांजाची विक्री होऊ नये म्हणून प्रशासन सज्ज असते व आहे.प्रशासन मांजाच्या दुकानावर छापे टाकते.तिथे कोठेही मांजा सापडत नाही किंवा दिसत नाही. नेमक्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजा कुठुन येतो,हा आताही सर्वांपुढे मोठा गंभीर प्रश्न आहे. प्रशासनाने ऑनलाईन खरेदी- विक्रीकडे करडी नजर ठेवण्याची नितांत गरज आहे. तेथुनच नायलॉन मांजावर ब्रेक लावता येईल.पोलिसांची सक्त कारवाई आणि निरअपराध लोकांचा जाणारा जीव किंवा दुर्घटना हे डोळ्यांनी दिसत असुन सुद्धा नायलॉन मांजा विक्रेता व खरेदीदारांना समज आलेला नाही ही दुर्दैवाची बाब आहे. मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजाच्या विक्री व खरेदीवर बंदी आहे. तरीही नायलॉन मांजाची विक्री सर्रास सुरू असल्याचे अनेक भागांत दिसून येते. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजाची आवक उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते. नायलॉन मांजावर बंदी असुन सुद्धा विक्री सर्रास सुरू आहे याला आपणच रोखु शकतो. नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्षांसाठी जीवघेना व अत्यंत घातक आहे त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होने अत्यंत गरजेचे आहे. कारण नायलॉन मांजाच्या विरोधात प्रशासनाने कंबर कसली आहे.त्याच धर्तीवर सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ऍक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे.राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजामुळे अंगावर शहारे येणाऱ्या घटना घडल्या आहेत आणि आताही घडतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.माझ्या लेखणीच्या माध्यमातून आपणास विनंती आहे की कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार होने अत्यंत आवश्यक आहे. याकरीता नागरिकांनीच प्रथम पाऊले उचलले पाहिजे तेव्हाच प्रशासनाला कारवाई करण्यास मोठी मदत नागरिकांकडून मिळेल असे मला वाटते. कारण नायलॉन मांजामुळे मानवी व पशुपक्षांच्या हजारो दुर्घटना दरवर्षी होत असतात आणि होत आहेत. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर विजेचे तार एकमेकांवर आदळतात व त्याचा स्पार्क होतो अशा वेळेस पतंग उडविणाऱ्याला कदाचित आपला प्राणसुध्दा गमवावा लागतो.पोलिस विभाग नायलॉन मांजाच्या बाबतीत सतर्कता बाळगुन लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे. परंतु प्रश्न आहे की, मांजा येतो कोठुन याची प्रशासना मार्फत सहनिशा झाली पाहिजे असे मला वाटते. नायलॉन मांजावर सरकार व पोलीस विभाग यावर लक्ष ठेवुन आहे. तरी मांजा येतो कोठुन हा अत्यंत गंभीर चिंतेचा विषय आहे.यावर सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित करून नायलॉन मांजा बाबतीत योग्य ते पाऊल उचलावे व नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सर्वतोपरी मदत करावी.जय हिंद.

लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# माणुसकी रसातळाला गेली तर देशाचा विनाश अटळ

हल्ली जगाच्या पाठीवर चांगल्या म ाणसांची संख्या कमी होऊन, आता अमानुष व वाईट लोकांची संख्या प्रचंड वाढत चालली आहे. म्हणूनच देशात बलात्कार, व्याभिचार, अत्याचार, अनाचार आणि भ्रष्टाचार प्रचंड प्रमाणात वाढला आहे. लहान बालिकेपासून ते वयोवृद्ध आजीपर्यंत बलात्कार करणारे महाभाग देशात खूप झाले आहेत. लहान बालिका असो, शाळा शिकणारी निष्पाप म ुलगी असो, कॉलेज करणारी तरुणी असो, वयस्क महिला असो अथवा वयोवृद्ध म्हातारी असो, यांच्यावर वासनेच्या भरात वासनांध झालेली व वासनेने पिसाटलेली तरुणाई बलात्कार करून मोकळी होत आहे. आणि माणुसकीला काळीमा फासत आहे. महिलांना भारतीय संविधानात पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. महिलांना कुठेही मुक्तपणे संचार करायला, भारतभर मनसोक्त फिरायला आणि कंपनीत, शेतात व इतर जागी काम धंदा करायला, हमखास कोणत्या ना कोणत्या कामानिमित्त घराबाहेर पडावेच लागते. तेव्हा महिलांचा आदर करण्याऐवजी, महिलांचा सन्म ान करण्याऐवजी, आम्ही महिलांचा सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या जागी, शाळेला व कॉलेजला जाताना अथवा कोणत्याही कामानिमित्त बाहेर फिरताना वासनांध तरुण वासनेच्या भरात त्यांच्यावर अमानुषपणे अत्याचार करून व माणुसकीला काळीमा फासून माणसात माणुसकी नाही हे सिद्ध करून दाखवत आहेत. एकेकाळी समाजात व गावात म हिलांचा मानसन्मान केला जायचा. म हिलांना आपल्या आईचा दर्जा देऊन परस्त्रीला आईसमान मानणारी माणसे अस्तित्वात होती. तेव्हाच्या लोकांवर योग्य वयात योग्य संस्काराची रुजवण करून ओरिजनल माणूस बनवणारी माणसे घरोघरी अस्तित्वात होती. त्याकाळी माणसे अडाणी होती परंतु समोरच्या माणसांवर संस्काराची रुजवण कशी करायची आणि त्याला माणूस कसे बनवायचे? याचा पुरेपूर अभ्यास त्यांना होता. त्याकाळी म हिला देखील सुसंस्कारी, चारित्र्यवान, शीलवान व गुणी होत्या. रस्त्याने जाताना थेट आपल्या नाकाकडे बघून चालणाऱ्या होत्या. विशेष म्हणजे अगोदरच्या मुली व महिला पूर्ण कपड्यात वावरायच्या आणि आपल्या शिलाला प्राणपणाने जपायच्या. परंतु आजकाल मुलामुलींवर संस्काराची पेरणी योग्य वयात न झाल्यामुळे मुले व मुली चारित्र्यहीन व अम ानुष निपजत आहेत. संस्काराच्या अभावामुळे सख्ख्या भावंडांमध्ये शेतीच्या वाटणीवरून अथवा घराच्या वाटणीवरून रोज वाद-विवाद व कलह सुरू आहेत. गुंठाभर जमि नीसाठी सख्ख्या भावंडांमध्ये एकम ेकांबद्दल कमालीचा रोष वाढला आहे. कोणताच भाऊ आपल्या भावाला इंचभर जमीन देखील सोडायला तयार नाही. गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्ख्या भावंडांम ध्ये काट्या कुऱ्हाडीची भांडणे होत आहेत. शेतीच्या वादातून सख्ख्या भावालाच सख्ख्या भावाने ठार केल्याच्या कित्येक बातम्या आपण आतापर्यंत वर्तमानपत्रांत वाचत आलो आहोत. पेरणीच्या तोंडावर पोलीस स्टेशन मध्ये जर कधी जाऊन बघितलात तर आपल्याला असे दिसून येईल की, शेतीच्या वादाचे सर्वाधिक खटले पोलीस स्टेशनमध्ये व कोर्टात दाखल होत असतात. एकेकाळी माणसे खूप मायाळू, प्रेमळ व जीवाला जीव देणारी होती. तेव्हा एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात होती. पूर्ण परिवार एका छताखाली गुण्यागोविंदाने राहायचा. एकत्र कुटुंब पद्धतीत ज्येष्ठांना खूप मानसन्मान होता. एखादा भाऊ गरीब असेल, त्याच्याकडे पैशाची चणचण असेल तर दुसरा भाऊ आपल्या भावाच्या आर्थिक संकटात मदत करायचा. तेव्हा प्रत्येक भाऊ एकाच विचाराने वागायचा. एखादी गोष्ट करण्याआधी आपल्या घरातील जेष्ठांचा व आई-वडिलांचा विचार घेऊनच पुढील पाऊल टाकायचा. परंतु आजकाल एकत्र कुटुंब पद्धती नष्ट होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आल्यामुळे आजकालची मुले आपल्या आई-वडिलांपासून अलिप्त राहून बायको मुलांत मनसोक्त जीवन जगत आहेत. गोरगरीब शेतकरी भावाच्या मुला मुलींच्या लग्नासाठी व शिक्षणासाठी आर्थिक हातभार लावायला कोणताच भाऊ पुढे येत नाही. भावाच्या सुखदुःखात खंबीरपणे साथ देत नाही. आजकालची मुले आई-वडिलांना खुशाल घराच्या बाहेर काढून वृद्धाश्रमात जाऊन रहा म्हणून सांगत आहेत. जवळच्या माणसासोबत म ाणूस असे अमानुषपणे वर्तन करत असेल तर दुसऱ्या व्यक्तीसोबत तो कसे वर्तन करत असेल? याचा विचार करून बघा.. आजकाल माणूस दुसऱ्याला माणुसकीचे धडे देत आहे परंतु स्वतः मात्र अंगात माणुसकी नसल्यासारखे वागत आहे. एसटी बसने प्रवास करताना आपण बघितले असेल की, वयोवृद्ध माणसाला अथवा दिव्यांग व्यक्तीला सीटवर बसण्यासाठी कोणताच माणूस जागा देत नाही. ते बिचारे वयोवृद्ध माणसे शेवटी खाली बसून प्रवास करतात. आरक्षित जागा असून देखील वयोवृद्ध माणसांना त्यांच्या आरक्षित जागी कोणीही बसू द्यायला तयार नसतो. राष्ट्रीय महामार्गावर दोन्ही गाड्यांची समोरासमोर टक्कर झाली आणि त्या भीषण अपघातात जखमी झालेल्या माणसांना तात्काळ दवाखान्यात नेण्यासाठी कोणीच पुढाकार घेताना दिसत नाही. उलट दवाखान्यात नेण्याऐवजी लोक बघ्याची भूमिका घेतात. फोटो व व्हिडिओ काढून सोशल मीडियावर व्हायरल करतात. परिणामी त्या जखमी व्यक्तींचा जीव जातो. परंतु माणुसकीच्या नात्याने कोणताच म ाणूस त्यांच्यातली माणुसकी दाखवत नाही. आजकाल कोणाचे लग्न असेल अथवा कोणाचा अंत्यविधी असेल तर कोणीच पुढाकार घेऊन ते काम पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करत नाही. म्हणजे याचा अर्थ असा की, हल्ली माणसांमध्ये माणुसकी केवळ नावाला शिल्लक राहिली आहे. माणसाला माणुसकी नसल्याची लाज वाटत नाही पण माणुसकीलाच माणुसकी असल्याची लाज वाटत आहे. आपल्या देशात अनेक धनवान व श्रीमंत लोक आहेत. त्यांच्याकडे अमाप संपत्ती व पैसा आहे. त्यांच्या कित्येक पिढ्या बसून खातील एवढा पैसा त्यांच्याकडे शाबूत आहे. चित्रपटात काम करणारे हीरो हीरोइन, खेळाडू, कारखानदार, उद्योगपती, संस्थाचालक आणि उच्चपदस्थ अधिकारी यांच्याकडे अमाप पैसा व संपत्ती आहे. परंतु ही माणसे आपल्यातील दानत व म ाणुसकी जराही दाखवून देत नाहीत. यांच्यात माणुसकी नावाची गोष्ट आहे का नाही? हेच कळायला मार्ग नाही. कारण ही माणसे एवढा पैसा असून देखील कधी गरजू लोकांना सढळ हाताने मदत करताना दिसत नाहीत. यांच्याकडे अमाप संपत्ती व पैसा असताना हे कोण्या अनाथाश्रम ांना व वृद्धाश्रमांना पैसा लावताना दिसत नाहीत. रस्त्याच्या कडेने राहणाऱ्या, झोपडपट्टीत राहणाऱ्या, पालात राहणाऱ्या व छपराच्या घरात राहणाऱ्या, गोरगरीब जनतेला आपला पैसा दान म्हणून दिला तर त्या गोरगरीब लोकांच्या डोळ्यातून आनंदाचे अश्रू आल्याशिवाय राहणार नाहीत. आणि तुमच्याही जीवनात आगळावेगळा आनंद निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. नाहीतर असे होऊ नये की, आपण माणसासारखे वागता वागता सैतानासारखे वागू लागलो तर मग मात्र माणुसकीचा अंत होऊन देशाचा विनाश अटळ आहे..

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# राजकारणात मानवतेचा स्पर्श : राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व

तो जव जव मार्गे चाले / कार्य करी पाऊले पाऊले / लोक पाहताचि नम्र झाले / दिसती त्यासि / तो नसेल तरी बोलका / व्याख्याता उपदेशक नेटका / तरी वक्त्या पंडिताहुनी लोकां / वजन तयाचे / ऐसीचि लोक गाव सुधारती / देशाचे नाव उज्वल करिती / नसेना कोणा त्यांची माहिती / सुगंध उधळती वनपुष्पे //



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे राजेश टोपे यांच्या रूपाने मराठवाड्यात कार्य कुशल सुपुत्राच्या जन्म पाथरवाला येथे ११ जानेवारी १९६९ रोजी म ाता शारदाताई व अंकुशराव टोपे साहेबांच्या पोटी झाला. राजकारणाचा वारसा कुटुंबातूनच अगदी कॉलेज जीवनात शैक्षणिक, सामाजिक, सहकार व राजकीय कार्याची आवड जालना जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते स्व.खा. ड. अंकुशराव टोपे साहेब यांच्या संस्कारातून व देशाचे नेते मा. खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नेतृत्वात राजकीय जडणघडण झाली. राजेश टोपे यांनी वयाच्या २३ व्या वर्षी राजकारणात प्रवेश केला. त्यांनी सलग पाच वेळेस अंबड व घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करतानाच महाराष्ट्राच्या राजकारणात राज्यमंत्री ते कॅबिनेट मंत्री म्हणून अत्यंत कार्य कुशल, अभ्यासू व मेहनती नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण केली. राजकारण अनेकदा सत्ताकेंद्रित आणि स्वार्थप्रधान असल्याचे टीका होते. परंतु माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आपल्या कार्यातून या सम जुतीला छेद दिला. २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले व त्यांच्याकडे आरोग्य मंत्री पदाची जबाबदारी आली. याच दरम्यान जगावर कोरोना महामारीचे संकट उभे राहिले या जागतिक आपत्तीचे प्रत्येक व्यक्तीच्या मनात भीतीचे वातावरण होते. या संकटात वेगवेगळे देशात- देशांतर्गत, राज्य अंतर्गत तसेच शहरातील व ग्रामीण भागात मदतीचे दरवाजे एकमेकांना बंद झाली. अवघ्या मानव जातीला नवीन असलेल्या कोरोना संकटाला दोन हात करण्यासाठी महाराष्ट्राचे लढवय्ये नेते राजेश टोपे साहेब अहोरात्र काम करत होते. या कार्यकाळात राज्यातील जनतेला राजेश टोपे यांनी सेवा, संवेदना आणि जबाबदारी या मूल्यांना प्राधान्य देवून राजकारणात मानवतेचा खरा अर्थ अधोरेखित केला. आरोग्य मंत्री म्हणून ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्थेतील तफावत कमी करण्यावर भर दिला. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये यांची सुविधा सुधारण्यासोबतच वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्धतेसाठी ठोस पावले उचलली. सामान्य रुग्णाला दर्जेदार आणि परवडणारी आरोग्यसेवा मिळावी, हा त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू राहिला.

कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात राजेश टोपे यांचे नेतृत्व विशेषत्वाने उठून दिसले. संसर्गाची तीव्रता, आरोग्य यंत्रणेवरील ताण आणि नागरिकांमधील भीती या साऱ्या परिस्थितीत त्यांनी संयम, पारदर्शकता आणि माणुसकीचा दृष्टिकोन जपला. रुग्णालयांची क्षम ता वाढवणे, टेस्टिंग सेंटर उभारणे, ऑक्सिजन पुरवठा, लसीकरण मोहीम, मेडिकल सुविधा, रुग्णवाहिका, डॉक्टर्स, नर्स स्टाफ, ऑक्सिजन बेड आणि आरोग्य कर्मचारी,पोलीस मित्र व समाजसेवकांचे मनोबल उंचावणे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सर्वसामान्य जनतेला दैनंदिन अन्नधान्य व वस्तू पुरवणे, रुग्ण तसेच नातेवाईकांना मानसिक धैर्य देण्याचे महत्त्वाचे काम रात्रंदिवस करत होते. प्रसारमाध्यमांशी संवाद साधून नागरिकांना योग्य माहिती देणे हेही त्यांच्या नेतृत्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. कोरोना काळात राजेश टोपे साहेब यांनी आरोग्य मंत्री या नात्याने प्रशासकीय यंत्रणा सोबत घेऊन माणुसकी कमी होत असताना आपण समाजाचे देणे लागतो या उदात्त हेतूने प्रेरित होऊन मानतवादी दृष्टिकोनातून समाजातील लहान थोर, महिला, तरुण व ज्येष्ठ नागरिकांना आपुलकीची साथ दिली. महाराष्ट्रातील कोरोनाग्रस्त जिल्ह्यातील रुग्णालयात प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णांना व नातेवाईकांना मानसिक धैर्य देत आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. ते स्वतः इंजिनियर आहे परंतु महाराष्ट्रातील जनता त्यांना डॉक्टर म्हणून ओळखू लागली. या काळात त्यांच्या मातोश्री शारदा ताई टोपे यांचे निधन झाले. तरी भैय्यासाहेब चौथ्या दिवशी जनसेवेसाठी कार्यरत राहिले. हे सर्व कार्य करत असताना महाराष्ट्रातील जनता प्रसारमाध्यमाद्वारे बघत होती. जनतेला राजेश टोपे म्हटले की आशेचा किरण वाटत होता. जनतेचे व साहेबांचे हृदयातील नाते तयार झाले होते. महाराष्ट्रातील जनता म्हणजे कुटुंब हे त्यांनी ठरवले होते. रात्री अपरात्री राज्याच्या कानाकोपऱ्यातून त्यांना फोन येत व ते जनतेला सुविधा पुरवत होते. स्वतः त्यांना जेवणासाठी ही वेळ कमी पडत होता. या सर्व कार्यात त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवती सौ. मनीषाताई टोपे या खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे उभ्या होत्या. या कार्यकर्तुत्वामुळेच राजकारणातील आजात शत्रू म्हणून त्यांची ओळख होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या वचनाप्रमाणे अगदी तंतोतंत उतरणारे व्यक्तिमत्व राजेश टोपे साहेब यांनी आपल्या गाव खेड्यापासून ते दिल्लीपर्यंत आपल्या कार्याची चुणूक दाखवली. व त्यांच्या कार्याची नोंद भारत देशात नव्हे तर डब्ल्यूएचओ पर्यंत झाली . एकूणच राजेश टोपे यांचे आरोग्य नेतृत्व हे सत्तेच्या प्रदर्शनापेक्षा सेवाभावावर आधारित राहिले. सामान्य नागरिकांच्या वेदना समजून घेणारे, संकटात धीर देणारे आणि आरोग्याला मूलभूत हक्क मानणारे हे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात मानवतेचा स्पर्श उमटवणारे ठरले.

साहेबांच्या अभिष्टचिंतन दिनानिमित्त म हाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने साहेबांना निरोगी व दीर्घ आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**डॉ. शंकर तिकांडे**
**जालना (८८८८१७११३४ )**

# तळेगाव दिंडोरीतील 'ईलाईट क्रॉन इंटरनॅशनल'वर भरारी पथकाची धाड

## ९ कोटी ६ लाख २५ हजार ४२५ रुपयांचा प्रतिबंधित सुगंधीत तंबाखू जप्त

**दिंडोरी । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या सुगंधीत पानमसाला, जर्दा, सिगारेट व तत्सम साहित्याचा तब्बल ९ कोटी ६ लाख २५ हजार ४२५ रुपयांचा साठा नाशिक येथील अन्न व औषध प्रशासनाच्या (ऋऊ) भरारी पथकाने जप्त केला आहे. ही कारवाई तळेगाव (ता. दिंडोरी) येथील मे. ईलाईट क्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड या कंपनीवर करण्यात आली असून, या प्रकरणी संचालकासह आठ जणांविरोधात दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे ही कारवाई राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या मतदारसंघातच झाल्याने मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक यंत्रणांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई

तळेगाव दिंडोरी येथील गट क्रमांक ३५२/२ मध्ये असलेल्या ईलाईट क्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड कंपनीत प्रतिबंधित सुगंधीत तंबाखूचा साठा बेकायदेशीररित्या ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती ऋऊ च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाचे सुरक्षा अधिकारी उमेश सूर्यवंशी, अन्न सुरक्षा अधिकारी जी. व्ही. कासार व जी. एम. गायकवाड यांच्या पथकाने कारवाई केली.

याआधी इगतपुरी, नाशिक रोड व गोंदे दुमाला येथील ग्लोबल टोबॅको एजन्सी (गट नं. ५२७//३) व सम्राट फि.पि.यु. इंडस्ट्रीज येथे छापा टाकण्यात आला. या ठिकाणी आढळलेल्या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या लेबलवर ईलाईट क्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड, तळेगाव दिंडोरी असे नमूद असल्याने तपासाचा रोख थेट तळेगावकडे वळला.

कारखान्यात सुगंधीत तंबाखू उत्पादन सुरू असल्याचे उघड

कारखान्याच्या तपासणीदरम्यान हृतिक कुमार चौधरी (क्वालिटी एक्झिक्युटिव्ह) यांची भेट झाली. तपासात तंबाखूमध्ये कोणताही नैसर्गिक सुगंध नसून, टोबॅको रिफाइंड ग्लिसरीन, इंडस्ट्रियल परफ्युम, सेंटेड मसाला कंपाउंड, रिफाइंड सोयाबीन ऑईल आदी घटक वापरून सुगंधीत तंबाखू तयार केला जात असल्याचे स्पष्ट झाले.

जप्त केलेला मुद्देमाल (थोडक्यात)

कश प्रीमिक्स शीशा पॅकेट - ५०८ बॉक्स : ३.८१ कोटी

सेंटेड टोबॅको - ५१० बॉक्स : ३.८२ कोटी

अल सबा प्रीमियम शीशा पॅकेट : ९.७५ लाख

स्पार्क जर्दा : १.९८ लाख

इंडस्ट्रियल परफ्युम (९,१५० किलो) : १२.५० लाख

सेंटेड मसाला कंपाउंड : १.१४ कोटी

रिफाइंड सोयाबीन ऑईल : १.४९ लाख

रिफाइंड ग्लिसरीन : १७,१००

पॅकिंग मटेरियल व सुगंधीत तंबाखू (३,५०० किलो) : २ लाख

एकूण जप्ती : ९,०६,२५,४२५

नमुने तपासणीदरम्यान हुंगल्याने हा साठा प्रतिबंधित सुगंधीत तंबाखूचा असल्याचे प्राथमिकदृष्ट्या निष्पन्न झाले आहे.

संचालकासह आठ जणांविरोधात गुन्हा

या प्रकरणी कंपनीचे संचालक विपीन शर्मा, एक महिला कर्मचारी, ॲडवर्ट मिचेल बारगोईन, सुसंता कुमार पांडा, व्यंकट रमेश पेनुमाक, दयानंद रे व मे. ईलाईट क्रॉन इंटरनॅशनल लिमिटेड यांच्याविरोधात दिंडोरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पॅकेजिंग मशिनरी व साहित्याचा पुनर्वापर होऊ नये म्हणून मेणबत्तीच्या सहाय्याने लाखेने पितळी मोहर मारून सर्व साहित्य सिलबंद करण्यात आले.

एसआयटी चौकशीची मागणी

राज्यात गुटखा, पानमसाला व सुगंधीत तंबाखूविरोधात कडक कारवाईसाठी मकोका कायद्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरला जात असताना, इतक्या मोठ्या प्रमाणात कारखाना सुरू कसा राहिला, याबाबत एसआयटी चौकशीची मागणी होत आहे. काही प्रशासकीय अधिकारी व खाकीधाऱ्यांच्या आशिर्वादानेच हा उद्योग सुरू होता का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# डॉ. बळीराम बागल यांचा फिजिशियन असोसिएशनतर्फे गौरव

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यात प्रथमच अत्यंत यशस्वी व उल्लेखनीय ऑर्गन रिट्रीव्हल (अवयव संकलन) प्रक्रिया पार पाडल्याबद्दल संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, जालना येथील संचालक डॉ. बळीराम बागल यांचा फिजिशियन असोसिएशन ऑफ जालना यांच्या वतीने गौरव करण्यात आला.

ही ऐतिहासिक ऑर्गन रिट्रीव्हल प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध, शास्त्रीय व नैतिक पद्धतीने यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. या कार्यामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन मिळण्याची आशा निर्माण झाली असून, जालना जिल्ह्याचा वैद्यकीय क्षेत्रातील मान उंचावला आहे.

फिजिशियन असोसिएशन ऑफ जालना यांच्या आयोजित सतत वैद्यकीय शिक्षण (उचए) कार्यक्रमात हा गौरव सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बागल यांच्या कार्याचे कौतुक करत, अवयवदान व ग्रीन कॉरिडोर संकल्पनेच्या यशस्वी



अंमलबजावणीसाठी त्यांच्या योगदानाचे विशेष अभिनंदन केले.

# घरकूल योजनेचा दिंडोरीकरांनी लाभ घ्यावा - नगरसेवक नितीन गांगुर्डे

## दिंडोरीत १४ जानेवारी घरकूल नोंदणी मेळावा

**दिंडोरी । प्रतिनिधी** - दिंडोरी नगरपंचायतीच्या हद्दीत पात्र लाभार्थ्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरु असून या योजनेसाठी दि. १४ जानेवारी २०२६ रोजी दिंडोरी नगरपंचायतीमध्ये मेळावा आयोजित करण्यात आला आहे. ज्यांच्याकडे जागा नाही त्यांचेही अर्ज जमा केले जाणार आहे. तरी गांधीनगर, इंदिरानगर, सिध्दार्थनगर, पेठ गल्ली तसेच दिंडोरी शहरातील पात्र लाभार्थ्यांनी घरकूल योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन दिंडोरी नगरपंचायतीचे नगरसेवक नितीन गांगुर्डे यांनी केले आहे.

याबाबत माहिती देतांना नगरसेवक नितीन गांगुर्डे यांनी सांगितले की, यापुर्वी शासन दरबारी प्रयत्न केल्याने शासनाकडून अतिक्रमित घरे ही कायम करण्यासाठी पाऊले उचलत आहे. सन २०११ पुर्वीची अतिक्रमणे कायम करण्यासाठी शासनाने सर्वे केला आहे व माहिती जमा केली आहे. दिंडोरी शहरात यासाठी अभियान राबविण्यात आले होते. आता गोरगरीब जनतेचे स्वतः चे घरे असावे, हे स्वप्न पुर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सरकारकडून अडीच लाखापर्यंत अनुदान दिले जाईल. भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटूंबातील इतर सदस्यांची नावे पक्की घरे नसावेत, गेल्या वीस वर्षात लाभार्थ्यांनी कोणत्याही घरकूल योजनेचा लाभ घेतलेला नसावा, वार्षिक उत्पन्न मर्यादा तीन लक्ष रुपये राहिल. नवीन घरकूलासाठी आधार कार्ड, कुटूंबातील सदस्यांचे आधार कार्ड, अर्जदाराचे आधार लिंक असलेले बँक पासबुक झेरॉक्स, उत्पन्नाचा दाखला, अर्जदाराचे पॅनकार्ड झेरॉक्स, अर्जदार जाती - जमातीसाठी असल्यास जात प्रमाणपत्र, जमिनीचा सातबारा उतारा, स्व मालकीची जमिन नसल्यास भाडेकरु करार नामा आदी कागदपत्रांची आवश्यकता असून ही कागदपत्रे दिंडोरी नगरपंचायत येथे जमा करुन ऑनलाईन नोंदणी करावे. त्याचप्रमाणे ज्यांच्याकडे स्वतः ची जागा नाही आणि घर नाही त्यांच्यासाठी शासनाने ए. एचपी योजना असून या योजनेंतर्गत सुध्दा लाभार्थ्यांना नोंदणी करता



येईल, त्यासाठी लाभार्थ्यांने शासनाकडे अर्ज करावा, दिंडोरी नगरपंचायतीच्या वतीने जागा नसलेल्यासाठी सुध्दा जिल्हाधिकार्यांकडे प्रस्ताव सादर केला जाणार आहे.बुधवार दि. १४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घरकूल योजनेंसाठी तसेच म्हाडा योजनेंसाठी विशेष नोंदणी अभियान दिंडोरी नगरपंचायत प्रधानमंत्री आवास योजना विभागात ठेवण्यात आले आहे. या अभियानात ज्यांना घरांची स्वप्ने पूर्ण करायची आहे त्यांनी नोंदणी करावी, असे आवाहने दिंडोरी नगरपंचायतीचे नगरसेवक नितीन गांगुर्डे यांनी केले आहे.

# सुनील रत्नपारखे यांना प्रभाग क्रमांक १६ मोठ्या प्रमाणात नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे; विजयाच्या उंबरठ्यावर



**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असून जो तो आपआपल्या परिने मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातच प्रभाग क्रमांक १६ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सुनील रत्नपारखे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांना प्रभागात मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. त्यांचा वाढता पाठिंबा पाहता परिसरातील जनता आता त्यांना विजयाचा उंबरठ्यावर पाहत आहे.

कॉर्नर बैठका, गाठी-भेटी, डोअर टू डोअर प्रचारावर सुनील रत्नपारखे यांनी भर दिला आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव कटीबद्ध राहणार असून सर्व सामान्यांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी महापालिकेच्या सभागृहात प्रवेश करायचा असल्याचा मानस त्यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केला. प्रभागातील नागरिकांना पाणी, स्वच्छता, चांगले रस्ते, अंतर्गत नाल्या, प्रभागाचे सुशोभिकरण करण्यावर भर देणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# जालन्याचे कैलास झोळगे ठरले मराठवाड्यातील पहिले समुद्रवीर

**जालना । प्रतिनिधी** - गुजरातमधील पोरबंदर येथे ४ जानेवारी रोजी पार पडलेल्या एस आर एस एस सी स्विमिंग ऑल इंडिया समुद्र वीर सागरी जलतरण स्पर्धेत जालना येथील राष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक व जलतरणपटू कैलास गजाननराव झोळगे यांनी १५ किलोमीटरचे समुद्राचे अंतर सलग पोहत पार केले व या स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून विजेते पदक व चषक मिळविले. या कामगिरीमुळे ते त्यांच्या वयोमनाचे मराठवाड्यातील पहिले समुद्र वीर ठरले आहेत.

या राष्ट्रीय सागरीय जलतरण स्पर्धेत विविध वयोगटातील देशातील १४०० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. देशात सर्वत्र थंडीची लाट असताना कैलाश या अष्टपैलू जलविराने प्रचंड इच्छाशक्ती, मेहनत, जिद्द, शिस्त व चिकाटीच्या जोरावर जालना सिव्हिल क्लबमधील २५ मीटर स्विमिंग पूलमध्ये सकाळी पाण्याचे तापमान ९ ते १० डिग्री सेल्सिअस असतानासुद्धा दररोज तीन ते चार तास सराव करून आपली शारीरिक क्षमता पणाला लावली. जगातील अत्यंत खडतर समुद्र अंतरा पैकी असे पोरबंदर समुद्रातील खारे पाणी, जलचर प्राणी, विविध सागरी जीवसृष्टी असलेल्या महासागरातील प्रचंड लाटा, हवा, बदलणारे तापमान व वेळोवेळी बदलणारी भरती ओहोटीची अनिमितता या खडतर परिस्थितीवर मात करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. कैलाश झोळगे राष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक जलतरणपटू असून, जालन्याचे पहिले लोहपुरुष हाफ आयर्न मॅन पाठोपाठ आता मराठवाड्याचे पहिले समुद्र वीर म्हणून त्यांनी आपली ओळख सिद्ध केली.

# जैववैद्यकीय घातक कचरा व्यवस्थापनासाठी नोडल अधिकारी नियुक्तीचे आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील जैववैद्यकीय घातक कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक व नियमबद्ध करण्याच्या दृष्टीने तसेच विविध निवेदनातील सूचनांच्या अंमलबजावणीसाठी जालना महानगरपालिका सहआयुक्त नंदा गायकवाड यांची जिल्हास्तरीय जैववैद्यकीय घातक कचरा व्यवस्थापन विषयक समन्वय व अंमलबजावणीसाठी नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. असे आदेश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

आपण इंडियन मेडिकल असोसिएशन, जालना शाखेचे अध्यक्ष किंवा सचिव यांचा जिल्हास्तरीय जैववैद्यकीय घातक कचरा विल्हेवाट निरीक्षण समितीत समावेश करण्यात यावा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याशी समन्वय साधून आवश्यक कारवाई करण्यात यावी. रुग्णालये व आरोग्य संस्थांसाठी दैनिक जैववैद्यकीय कचरा संकलन-विल्हेवाट (प्रकार, प्रमाण, विल्हेवाट संस्थेचा तपशील) नोंदणी व देखरेखीसाठी मायजालना मोबाईल ॲपमध्ये स्वतंत्र मॉड्यूल विकसित व कार्यान्वित करण्यात यावा. या कार्यवाहीसाठी संबंधित सर्व अधिकारी व विभागांनी नोडल अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करावे,

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्ष

# नांदेड येथील कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूर्वतयारी बैठक संपन्न

जालना । प्रतिनिधी 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास देशासह आंतरराष्ट्रीयस्तरावरून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, या कार्यक्रमास जालना जिल्ह्यातील भाविकांना उपस्थित राहता यावे यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. तसेच विविध माध्यमातुन शक्य तेवढी मदत पोहचविण्यात यावी यासाठी नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित होणाऱ्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत श्रीमती मित्तल बोलत होत्या. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, सुचित कुलकर्णी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, शिक्षणाधिकारी बी. आर. खरात यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, नांदेड येथे होणाऱ्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येणार आहेत. जालना जिल्ह्यात देखील श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदायातील भाविक मोठ्या प्रमाणात आहेत. त्या अनुषंगाने या नागरिकांना या कार्यक्रमास उपस्थित राहाता यावे यासाठी आपल्या जिल्ह्यातील सर्व तालूके आणि ग्रामीण भागात विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात यावी. यासाठी शिक्षण विभागाने युवकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वकृत्व, रिल्स स्पर्धा आयोजित कराव्यात. तसेच सीएसआरच्या माध्यमातून किंवा दानशुर व्यक्तीकडून अन्न-धान्य, पाणी आदी मदत करता येईल का याचे नियोजन करावे. तसेच जालना जिल्ह्यातून नांदेड येथे येणाऱ्या भाविकांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी वैद्यकीय कॅम्प उभारण्यासाठीचे नियोजन करावे. तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदायातील मान्यवरांची बैठक आयोजित करुन व्यापक जनजागृती आणि विविध माध्यमातून कोणती मदत करता येईल याची माहिती घेवून त्यानुसार नियोजन करावे. यावेळी बैठकीस मुख्याधिकारी, गट शिक्षणाधिकारी आदींची उपस्थिती होती.



### जालना जिल्हा पोलीस वार्षिक अहवाल २०२५:

# दरोडे आणि जबरी चोरीच्या घटनांत घट; प्रतिबंधात्मक कारवायांत वाढ

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा पोलीस दलाने सन २०२५ या वर्षात राबविलेल्या नियोजनबद्ध पोलिसींग आणि तांत्रिक तपासामुळे जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेत सकारात्मक बदल दिसून येत आहेत. सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये मालमत्तेविरोधी गंभीर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय घट झाली असून, अवैध धंदे आणि गुन्हेगारांविरुद्ध कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यश आले आहे.

**गंभीर गुन्ह्यांचे विश्लेषण (२०२४ विरुद्ध २०२५)**

जिल्ह्यात खुन आणि घरफोडीच्या घटनांमध्ये किंचित वाढ झाली असली तरी, दरोडा आणि जबरी चोरीच्या घटनांमध्ये मोठी घट नोंदवण्यात आली आहे:

दरोडा (Dacoity): २०२४ मध्ये ११ गुन्हे होते, जे २०२५ मध्ये केवळ ५ वर आले आहेत.

जबरी चोरी (Robbery): २०२४ मधील ७५ गुन्ह्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये ६३ गुन्हे नोंद झाले.

खून (Murder): २०२४ मध्ये ३८ खुनाचे गुन्हे होते, जे २०२५ मध्ये ४५ झाले आहेत.

घरफोडी (HBT): २०२४ मधील २०४ गुन्ह्यांच्या तुलनेत २०२५ मध्ये २१२ गुन्हे नोंदवण्यात आले.

अवैध धंदे आणि जप्त मालमत्ता

जालना पोलिसांनी दारूबंदी आणि जुगारासारख्या अवैध धंद्यांवर मोठी कारवाई करत कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे:

दारूबंदी (Prohibition): १६५५ केसेस मधून १.७० कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली.

जुगार (Gambling): ६७९ केसेस मधून ३.५६ कोटींची मालमत्ता जप्त केली.

वाळू तस्करी (Sand Theft): वाळू तस्करी विरोधात ३०४ केसेस दाखल करून २०.८९ कोटी रुपयांचा विक्रमी मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अंमली पदार्थ (NDPS): एनडीपीएस कायद्यांतर्गत ४५ कारवायांमध्ये १.५९ कोटींचा माल जप्त झाला.

गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई

कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी पोलिसांनी सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रतिबंधात्मक कलमांचा प्रभावी वापर केला आहे:

तडीपार (Externment): २०२४ मधील २५ च्या तुलनेत २०२५ मध्ये ५० गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले.

BNS अंतर्गत कारवाई: कलम १२६ अन्वये ११,०४१ आणि कलम १२९ अन्वये ७८३ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

मकोका (MCOC-) व MPD: २०२५ मध्ये ४ टोळ्यांवर मकोका आणि १० जणांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली.

**महिला व बाल सुरक्षा**

पोलीस प्रशासनाने महिला सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सन २०२५ मध्ये पळवून नेलेल्या १६७ अल्पवयीन मुलींपैकी १५३ मुलींचा यशस्वी शोध घेण्यात आला आहे.

**वाहतूक शाखा: बेशिस्त वाहनधारकांना दणका**

जालना शहर वाहतूक शाखेने ४८,५३४ केसेस दाखल करून ४.६३ कोटी रुपयांचा दंड वसूल केला. यामध्ये सर्वाधिक कारवाई 'ट्रिपल सीट' (१३,०७१ केसेस) आणि 'मोबाईलवर बोलणे' (४,०१२ केसेस) यांवर करण्यात आली.

ही संपूर्ण कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि त्यांच्या सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि गुन्हेगारी मुक्त जिल्ह्यासाठी पोलीस दल सदैव कटिबद्ध असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

### अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समितीची स्थापना!

# शिक्षक व शिक्षण विरोधी धोरणा विरोधात आवाज उठवणार!

### ५ फेब्रुवारीला संसदेवर मोर्चा!

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** केंद्र आणि राज्य सरकारच्या शिक्षक व शिक्षण विरोधी धोरणांना विरोध करण्यासाठी देशातील सात मोठ्या संघटनांनी एकत्र येत अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समितीची (IJCTO) स्थापना केली आहे. समिती शिक्षण व शिक्षकांच्या ज्वलंत प्रश्नावर देशव्यापी आंदोलन करणार असून ५ फेब्रुवारी रोजी संसदेवर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, देशातील शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला असून केंद्र आणि राज्य सरकारकडून देश उभारणीच्या महत्वाच्या या क्षेत्राकडे कमालीचे दुर्लक्ष आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, विद्यापीठीय शिक्षकांच्या देशातील सात बलाढ्य संघटनांनी एकत्र येऊन एकीची वज्रमूठ आवळली आहे. अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समितीची (एआयजेसीटीओ) ने कृती कार्यक्रम घोषित केला असून खालील मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येणार आहे.

RTE कायद्यापूर्वी नियुक्त झालेल्या सेवेत असलेल्या शिक्षकांना सक्तीच्या ढएढ मधून सूट देण्यात यावी किंवा त्यांच्या सेवा, पदोन्नती व उपजीविकेचे संरक्षण करण्यासाठी कायमस्वरूपी सवलत/दुरुस्ती करण्यात यावी. आवश्यक असल्यास ठढए कायद्यात दुरुस्ती करून ढएढ फक्त नव्या नियुक्त्यांनाच लागू करावा.

जुनी पेन्शन योजना (OPS) पुनर्स्थापित करा: NPS व UPS रद्द करून सर्व शिक्षकांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी.

सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेला हानी पोहोचवणाऱ्या NEP २०२० मधील सर्व तरतुदी त्वरित मागे घ्याव्यात.

शाळांचे विलीनीकरण व बंद प्रक्रिया थांबवावी; सर्व रिक्त पदे तात्काळ भरावीत.

शिक्षकांवरील अशैक्षणिक (non-teaching) कामाचा भार कमी करून त्यांना केवळ अध्यापन कार्यापुरते मर्यादित ठेवावे.

शिक्षण क्षेत्रातील तात्पुरत्या/कराराधीन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करून सर्व सामाजिक सुरक्षा सुविधा द्याव्यात.

समान कामासाठी समान वेतन या तत्त्वानुसार किमान वेतनाची अंमलबजावणी करावी.

८व्या केंद्रीय वेतन आयोगाची (टींह उझउ) वेळेत अंमलबजावणी सुनिश्चित करावी. अखिल भारतीय शिक्षक संघटना संयुक्त कृती समिती ५ फेब्रुवारी रोजी संसदेवर मोर्चा काढणार असून मोर्चात प्रचंड संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही.जी.पवार, अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष औताडे ए. बी. उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,. जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे जिल्हा सचिव संजय येळवंते केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रेमदास राठोड केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आरेफ कुरेशी कोषाध्यक्ष नारायण मुंडे जिल्हा कार्याध्यक्ष फरकूंद अली सय्यद, उपाध्यक्ष जगन वाघमोडे, भीमाशंकर शिंदे, सहसचिव प्रद्युम्न काकड,.. गणेश मेहेत्रे, गणेश चव्हाण, संजय चव्हाण यांनी केले आहे.

# व्यापाऱ्यांचे हित जोपासणाऱ्यांच मतदान करणार

### व्यापारी महासंघाने जाहीर केली भूमिका, प्रसिद्धीस दिले विविध मागण्यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** शहर व जिल्ह्यातील वीस हजार व्यापाऱ्यांचे प्रतिनिधत्व करणाऱ्या जालना जिल्हा व्यापारी महासंघाने महापालिकेच्या निवडणुकीनिमित्त जो पक्ष किंवा उमेदवार शहराच्या विकासासाठी व व्यापारी वर्गाच्या हितासाठी व्यापारी महासंघाने केलेल्या मागण्याचे आपल्या जाहीरनाम्यात स्पष्ट उल्लेख करेल. त्या पक्षाच्या किंवा उमेदवाराचा व्यापारी वर्ग मतदानासाठी विचार करेल अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे.

सध्या महानगरपालिका क्षेत्रात आस्थापना करास स्थगिती आहे पण तो पूर्णपणे रद्द करण्यात यावा. शहरातील नागरिक आपली मालमत्ता भाडेतत्त्वावर दिल्यानंतर येणाऱ्या किरायावर महानगरपालिका जवळपास ५०% टॅक्स आकारत असल्यामुळे येथे कार्पोरेट क्षेत्रातील ऑफिसेस किराया वरील मालमत्ता कर जास्त असल्यामुळे जालना शहराची निवड करत नाही. किरायाने देणाऱ्या मालमत्तेवर महानगरपालिकेचा कर जास्त असल्यामुळे कोणीही आपली खाजगी मालमत्ता भाड्याने देण्यात तयार होत नाही त्यामुळे शहराची प्रगतीस खिळ बसत आहे. हा टॅक्स रद्द करून कमर्शियल प्रॉपर्टीच्या दराने किंवा कार्पेट एरिया मोजून घेण्यात यावा. ऑनलाइन मार्केटिंग मुळे छोटे-मोठे व्यापारी मेटाकुटीस आलेले आहे. त्यांचे मार्जिन खूप घटले आहे. ते आपला व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करत आहेत. तीनशे स्क्वेअर फूट पर्यंत दुकान असणाऱ्यां अशा व्यापाऱ्यांच्या आस्थापनास मालमत्ता करातून संपूर्ण सूट देण्यात यावी. दुकानासमोर उभ्या राहत असलेल्या अधिकृत व अनाधिकृत हातगाड्यां मुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या जागेवर स्पेशल हॉकर झोन निर्माण करून तेथे हातगाड्यांना व्यापार करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. महापालिकेचा शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या फुले मार्केटचे काम महापौराची निवड झाल्यानंतर त्वरित करण्यात यावे व तेथे पार्किंगची व्यवस्था करण्यात यावी. शहरातील बाजारपेठेत स्वच्छताघर किंवा फिरते स्वच्छताघराची व्यवस्था करावी. महानगरपालिकेचा कारभार सर्व ऑनलाईन करण्यात यावा व कुठलीही काम पूर्ण करून देण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळेचे बंधन देण्यात यावे. शहरातील नागरिकांसाठी साठी महापालिका क्षेत्रात कुठलेही अद्यावत उद्यान नाही महानगरपालिका वृक्ष कर घेते मग उद्यान का डेव्हलप करत नाही? त शहरातील सर्व उद्यानावर असलेले अतिक्रमण काढून ते विकसित करावे. शहर स्वच्छतेबाबत मानांकात फारच मागे आहे. कचरा गाड्याची व्यवस्थापन व शहरातील स्वच्छतेबाबतचे व्यवस्थापन अद्ययावत पद्धतीने करण्यासाठी एखादी नवीन सिस्टीम इस्टॅब्लिश करावी, आदी मागण्या व्यापाऱ्यांकडून करण्यात आलेल्या आहेत.

सर्वच उमेदवार व पक्ष व्यापारी वर्गासाठी समान आहेत. या महापालिकेच्या निवडणुकीत जो पक्ष व उमेदवार शहराच्या विकासासाठी व व्यापारी वर्गाच्या हितासाठी जालना जिल्हा व्यापारी महासंघाने केलेल्या मागण्याचा उल्लेख आपल्या जाहीरनाम्यात करतील, अशाच उमेदवारास किंवा पक्षाच्या उमेदवारास व्यापारीवर वर्ग मतदान करतील. अशी प्रतिक्रीया श्यामसुंदर लोया, महासचिव, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्स यांनी दिली.

**मालमत्ता कराच्या नावाने व्यापाऱ्यांची लूट**

महापालिका अस्तित्वात आल्यानंतर शहरात खूप समस्या वाढल्या आहेत. महापालिकेचा कारभार ढेपाळलेला आहे. शहर स्वच्छतेबाबतचे असलेल्या मानंकनामध्ये शहर फार मागे आहे. महापालिका व्यावसायिक मालमत्ता कराच्या नावाने व्यापाऱ्यांची लूट करत आहे. ग्राहकासाठी मुख्य बाजारपेठेत पार्किंगची व्यवस्था नाही. तसेच स्वच्छतागृहे सुद्धा व्यवस्थित नाहीत. शहरात सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासाठी एकही चांगले नाट्यगृह नाही तसेच एकही चांगले उद्यान नाही. या सर्व सुधारणा जो उमेदवार करेल अशी खात्री व्यापारी वर्गाला झाली तरच त्याला व्यापारी वर्ग मतदान करतील. असे विनीत साहनी, जिल्हाध्यक्ष व्यापारी महासंघ, जालना यांनी म्हटले आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

# जमीनीचे खोटे दस्ताऐवज तयार करुन फसणुक करणारा फरार आरोपी जेरबंद

### जिल्हा वाहतुक शाखा व आर्थिक गुन्हे शाखेकडुन जेरबंद

**जालना । प्रतिनिधी -** फिर्यादी मनोज मुथा यांना बाजार भावापेक्षा कमी भावात जमीन देण्याचे प्रलोभन दाखवुन मुळ जमीन मालकाला माहीती मिळु न देता यातील सर्व आरोपीतांनी संगणमत करुन आरोपी सुनिल लक्ष्मणराव खुर्दे याने जमीनीचा मुळ मालक शिवाजी कुंडलीक चिंचेकर या नावाचे बनावट आधारकार्ड तयार करुन तो स्वता जमीनीचा मुळ मालक असल्याचे फिर्यादी यांना भासवुन फिर्यादी व त्याचे भागीदार यांची १ कोटी ३० हजार रुपयांची फसवणुक केल्याने पोलीस स्टेशन सदर बाजार येथे गुन्हा रजि. क्र. १०५५/२०२३ कलम १२० (ब),३८६, ४०६, ४१९, ४२०, ४६३, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादवि. अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे. सदर गुन्हयात यापुर्वी १ आरोपीस अटक करण्यात आलेले असुन यातील काही आरोपी अद्याप पावेतो फरार आहेत.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे विकास रामभाऊ मुळे वय ४३ वर्षे रा. भिवगाव बु// ता.देऊळगाव राजा जि. बुलढाणा हा देऊळगाव राजा येथुन जालना येथे येत असल्याची गोपनिय बातमीदाराकडुन माहीती मिळाल्याने वरीष्ठांचे परवानगीने जिल्हा वाहतुक शाखा व आर्थीक गुन्हे शाखा यांनी सापळा रचला असता सदर आरोपी पोलिसांना पाहून गाडी उलट्या दिशेने घेऊन पळून जाऊ लागला म्हणून काही अंतरावर त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले त्याच्याकडे विचारपुस केले असता त्यांनी उडवाउडविची उत्तरे देऊ लागल्याने त्याचे रेकॉर्ड तपासले असता सदर आरोपी हा विकास रामभाऊ मुळे हाच असल्याचे खात्रीशीर निष्पन्न झाले तसेच त्याच्यासोबत असलेला त्याचा सहकारी नामे राहुल सर्जेराव गाडेकर याचेही रेकॉर्ड तपासले असता तो देऊळगाव राजा पोलीस स्टेशन कडील गुन्ह्यामध्ये फरार असल्याचे समजल्याने दोन्ही आरोपीतांना जिल्हा वाहतूक शाखा व आर्थिक गुन्हे शाखेतील अंमलदार यांनी आर्थिक गुन्हे शाखा येथे आणून सखोल चौकशी केली असता त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने यातील आरोपी नामे विकास रामभाऊ मुळे यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे तर दुसरा आरोपी नामे राहुल सर्जेराव गाडेकर यास देऊळगाव राजा पोलीस स्टेशन यांच्या ताब्यामध्ये पुढील कार्यवाहीसाठी देण्यात आलेले आहे सदर दोन्ही आरोपी हे गुन्हा दाखल झाल्यापासून आपले वास्तव्य लपवून फरार राहत होते गोपनीय माहितीचा वापर करून सदर आरोपींना ताब्यात घेण्यात आलेले असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे

सदरची कामगीरी ही मा. श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, श्री चंद्रकांत चातुरे स.पोनि जिल्हा वाहतुक शाखा, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे व जिल्हा वाहतुक शाखेचे गणेश जाधव, संदिप बोंदरे, गजानन जारवाल, विनायक चित्राल यांनी पार पाडली

# नैसर्गीक अनुदान घोटाळ्यातील आरोपीस सहाय्य करणारा एजंट आर्थिक गुन्हे शाखेने केला अटक

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यामध्ये शासनाने वेळोवेळी ०४ जी आर काढुन बाधित शेतकऱ्यांना अनुदान जाहीर केले होते. त्यामध्ये अंबड व घनसावंगी तालुक्यात यादया अपलोडींगचे काम काज करणारे संबधत अधिकारी कर्मचारी यांनी मोठया प्रमाणावर बोगस (शेती नावावर नसलेले) नावे यादया मध्ये अपलोड करुन त्यांचे नावे आलेल्या शासनाचे अनुदानाची रक्कम त्यांचे कडुन परस्पर परत घेतल्या संबंधी तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर प्रकरणात सत्यता पडताळणी साठी चौकशी समीती गठीत केली होती.

चौकशी समीतीने चौकशी करुन एकुण २४० गावामध्ये □२४,९०,७७,८११/- इतक्या शासकीय रकमेचा अपहार झाला असल्या बाबत अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणात पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा रजि. क्र. ४५३/२०२५ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८, ३(५) इछ्ड सह कलम ५२, ५३ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा जालना करीत आहे. सदर गुन्हयात यापुर्वी १२ ( बारा ) आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपी पवन सुलाने याचेकडे विचारपुस केली असता त्यास अनुदान याद्या तयार करतांना त्यास मदत करुन छ.संभाजीनगर जिल्ह्यातील व गंगापुर, खुलताबाद, फुलंब्री, वैजापुर, तालुक्यातील आपल्या नातलगांची नावे तलाठी पवन सुलाने यांना देऊन त्या माध्यमातुन लाखो रुपयांचे बोगस आनुदान तलाठयास मदत करणारा आरोपी नामे सुरेश गिरधार नागलोत वय ४४ वर्षे, रा. धनगरपिंपळगाव ता.अंबड जि. जालना याचा सक्रीय सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास मौजे धनगर पिंपळगाव येथुन सदर गुन्हात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीसह एकुण १३ आरोपीतांना अटक करण्यात आर्थिक गुन्हे शाखेला यश आलेले असुन फरार आरोपीतांचा व त्यांचे एजंटचा शोध सुरू आहे.

सदरची कामगीरी ही मा. श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जया निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

## मोटार सायकल चोरी करणारा आरोपी जेरबंद करुन रु.३५,०००/-किंमतीची एक मोटार सायकल केली जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हयात मोटार सायकल चोरी करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बसंल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रोजी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघड करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक तयार करुन पथकातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांना सुचना दिल्या त्यानुसार मोटार सायकल चोरी करणाऱ्या इसमांबाबत माहिती मिळवित असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इसम नामे संदीप मारुती कदम, वय ३३ वर्ष, रा.लालवाडी, ता. अंबड जि. जालना याकडे चोरीची मोटार सायकल असल्याची माहिती मिळाल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने त्याच्या ताब्यातील रु.३५,०००/- किंमतीची एक होंडा शाईन मोटारसायकल काढुन दिल्याने ती जप्त करण्यात आली तिचा गुन्हयाचा अभिलेख तपासला असता सदर बाजार पोलीस ठाणे, जालना गु.र.क्र.५८५/२०२५ कलम ३०३(२) भा.न्यां.सं. गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले. त्यामुळे आरोपीतास पुढील तपासकामी सदर बाजार पोलीस ठाणे, जालना येथे देण्यात आले आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. योगेश उबाळे, सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास, रमेश काळे, किशोर पुंगळे, कैलास चेके, अशोक जाधवर स्था.गु.शा. जालना यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.